देशोन्नती 23/03/2025

## वार्षिक तपासणी

# पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केली उमरी ठाण्याची वार्षिक तपासणी

देशोन्नती वृत्तसंकलन

**उमरी** : नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी शुक्रवारी उमरी पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी करून कामाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

पोलीस विभागातर्फे दरवर्षी वरिष्ठ अधिकाऱ्याकडून वार्षिक तपासणी करण्यात येते. यावर्षी नांदेड परिक्षेत्राचे कर्तव्यदक्ष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी शुक्रवारी उमरी पोलीस ठाण्याची तपासणी करून केलेल्या कामाचे यावेळी त्यांनी कौतुक केले आहे. तसेच पोलीस पाटील संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. उमरी तालुका पत्रकार संघातर्फे पत्रकार बी. व्ही. चव्हाण, शेख हुसेनी यांनी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांचा सत्कार करण्यात आला आहे. यावेळी पोलीस ठाण्याच्या आवारात अधिकाऱ्यांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले आहे. झालेल्या वार्षिक तपासणीत पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक के एन धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक अंकुश माने सह पोलीस कर्मचारी, महिला पोलीस कर्मचारी उपस्थित होते. (ता.प्र.)

